**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.६
दिनांक : २८.०६.२०२१

## बेस्टतर्फे वीजग्राहकांसाठी गो ग्रीन उपक्रमाअंतर्गत ई-वीजदेयक प्रणालीचे उद्‌घाटन

मुंबई, २८ - वीजग्राहकांना पर्यावरणपूरक अशा ‘ गो ग्रीन ’ उपक्रमाअंतर्गत ई-वीजदेयक प्रणालीचा उद्‌घाटन सोहळा आज बेस्टच्या कुलाबा येथील मुख्यालयात महाराष्ट्र राज्याचे पर्यटन, पर्यावरण आणि राजशिष्टाचार मंत्री मान.आदित्यजी ठाकरे यांच्या शुभहस्ते बेस्ट समिती अध्यक्ष श्री. आशिष चेंबूरकर यांच्या उपस्थितीत पार पडला.

या ‘गो ग्रीन’ उपक्रमाअंतर्गत बेस्ट उपक्रमाच्या वीजग्राहकांना एसएम्एसद्वारे ई-वीजदेयक प्रणालीचा स्विकार करण्यासाठी आवाहन करण्यात येणार आहे. वीजग्राहकाने सदर आवाहनाला दिलेल्या लिंकद्वारे प्रतिसाद दिल्यास त्याला दरवर्षी रुपये १२०/- इतकी सवलत मिळू शकते तसेच ई-वीजदेयक पर्याय स्विकारल्यामुळे अंदाजे २,००० झाडांचे संरक्षण होऊ शकते.

यावेळी बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक श्री. लोकेश चंद्र यांनी ‘ गो ग्रीन ’ उपक्रम तसेच मुंबईतील बससेवा अधिकाधिक प्रवासीभिमुख करण्याच्या दृष्टीने बसमार्गांचे सर्वोत्तमीकरण याविषयी मान.मंत्री महोदयांसमोर सादरीकरण केले. या सादरीकरणातून बससेवेचा नवीन आराखडा लवकरच कार्यान्वित करण्यात येईल, जेणेकरुन मुंबईकर जनतेला अधिक सक्षम आणि प्रवासीभिमुख बससेवा पुरविण्यात येईल, अशी माहिती दिली. त्याचप्रमाणे महाव्यवस्थापकांनी माहिती आणि तंत्रज्ञानावर आधारित प्रवाशांना माहिती, तिकीट सेवा उपलब्ध करुन देणे, तसेच बस ट्रॅकिंग आणि रस्त्याच्या नकाशाबाबत तपशील देखील मंत्री महोदयांना सविस्तरपणे सांगितला.

श्री. आदित्य ठाकरे यांनी वीजग्राहकांना ई-वीजदेयक स्विकारण्याचे आवाहन केले आणि बेस्टने हाती घेतलेला बससेवेचा नवीन उपक्रम अभिनंदनीय असून बेस्ट उपक्रमाने जगातील सर्वोत्तम बससेवा मुंबईकर जनतेला पुरविण्याच्या दृष्टीने अधिकाधिक प्रयत्न केले पाहिजेत आणि याकरिता प्रदुषणमुक्त अशा इलेक्ट्रिक बसगाडयाचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे. ते पुढे असे म्हणाले की, बेस्ट उपक्रमाने प्रवाशांकरिता स्मार्ट कार्डचा वापर सुरु करण्याबद्दल नियोजन केल्याचे ऐकून मला अतिशय आनंद झाला आणि लवकरच ही सुविधा लोकांकरिता उपलब्ध करुन देण्याची अपेक्षा केली.